# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०५/२०२४ (सोमवार) सायंकाळ**

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पो.स्टे. कुही :— अंतर्गत मौजा उटी शिवार येथे दिनांक १२/०५/२०२४ चे २०.४५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, नमुद घटनास्थळी अवैधरित्या टिप्परच्या साहाय्याने रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफने घटनास्थळी जावुन १० चक्का टिप्पर क्र. एम एच—४०/ सी टी ३२८६ चा चालक व **आरोपी नामे— आदीत्य देविदास कुरूटकर वय २१ वर्ष रा. डोंगरगाव ता. कुही** हा त्यांचे टिप्परमध्ये अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक करतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून टिप्परमध्ये असलेल्या ०६ ब्रास रेती किंमती अंदाजे ३५०००/— रुपये व १० चक्का टिप्पर क्र. एम एच—४०/सी टी— ३२८६ किंमती ३०,००,०००/—रू. असा एकूण ३०,३५,०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. **१) टिप्पर चालक आदीत्य देविदास कुरूटकर वय २१ वर्ष रा. डोंगरगाव ता. कुही व टिप्पर मालक २) टिप्पर मालक नामे पवन चकोले रा. नागपुर** यांचेविरूदध पोस्टे कुही येथे कलम ३७९, १०९, भादवि ४, २१ खा.ख. सह. ४८(७), ४८(८) जमीन महसुल सं १९६६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यातील आरोपी क्र. १) याला अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कुही येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक भानुदास पिंदुरकर पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, पोहवा लांजेवार, धोंडे, चाचेरकर यांनी पार पाडली.



## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. खापा :– अंतर्गत मौजा बावणगाव शिवार येथे दिनांक १२/०५/२०२४ चे रात्री ०१.०० वा. ते ०२.०० वा. दरम्यान खापा पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा बावणगाव शिवार येथे काही इसम आपल्या ताब्यातील वाहनामध्ये अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक करीत असल्याची माहिती मिळाल्याने मौजा बावणगाव शिवार येथे नाकाबंदी केली असता शेवरलेट कंपनीची सिल्वर रंगाची कार क्र. एम एच– ३१/सी एस ८१६२ मध्ये ०५ गौवंश कत्तल करण्याचे उद्देशाने अत्यंत क्रुरपणे व निर्दयतेने वाहनात कोंबुन वाहतुक करतांना पोलीसांना पाहुन त्यांचे ताब्यातील कार जागेवर सोडुन अंधाराचा फायदा घेवुन फरार झाले. आरोपींचे ताब्यातून घटनास्थळाहुन ०५ गौवंश किंमती ३५,०००/–रू. व शेवरलेट कंपनीची सिल्वर रंगाची कार क्र. एम एच– ३१ सी एस ८१६२ किंमती २,००,०००/– रू. असा एकुण २,३५,०००/–रू. चा मुद्देमाल आरोपींकडुन जप्त करण्यात आला आहे. **आरोपी नामे– १) आशिक छोटु शेख, वय २३ वर्ष रा. कोदेगाव २) सोयल मेहबुब शाहा वय २१ वर्ष रा. चिचपुरा, सावनेर ३) माजीद साबीर खान, वय ३० वर्ष रा. लष्करीबाग जि. नागपुर** यांना अटक करण्यात आली असुन त्यांचेविरूद्ध पोस्टे खापा येथे कलम ११(१),(ड) प्राण्याचा छळ प्रति. अधिनियम सहकलम ५ (अ) १, ९ महा. पशु सं. अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापा येथील ठाणेदार सपोनि सुनिल दहीभाते, पोउपनि सचिन जंगम, पोशि पन्नालाल बटाउवाले यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर